अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ/साप्र/आस्था/११३९
दिनांक - २२/०५/२०२०

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- श्री. युनुस पठाण, महापालिका सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :-
१) कार्यालयीन आदेश जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/२४, दि.०२/०४/२०२०.
२) डॉ. नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय, नियंत्रण कक्ष जा.क्र. IDH/४९९, दि.१२/०५/२०२०.
३) मा. महापालिका आयुक्त यांचा ठ.क्र. १/४६, दि. २०/०५/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. युनुस पठाण, महापालिका सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग हे सध्या कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत कोरोना विषाणु प्रादुर्भाव नियंत्रण करण्यासाठी डॉ. नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय येथे तयार केलेल्या नियंत्रण कक्षामध्ये संदर्भ क्र. १ च्या कार्यालयीन आदेशानुसार कार्यरत आहेत. त्यांनी संदर्भ क्र. २ अन्वये दि. १८/०५/२०२० ते २२/०५/२०२० अखेर (दि. २३ व २४/०५/२०२० या साप्ताहीक सुट्टीस जोडून) ६ दिवस हक्काच्या रजा मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांजकडेस अर्ज सादर केला आहे. सदरच्या रजेस मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. ३ च्या ठरावान्वये मान्यता दिली आहे.

श्री. युनुस पठाण यांचेकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग या पदाचा पदभार श्री. रोहिदास देवडे, उप अभियंता यांचेकडे सोपविणेत येत आहे.

तसेच, श्री. युनुस पठाण यांचेकडील संदर्भ क्र. १ च्या कार्यालयीन आदेशानुसारचे कामकाज श्री.रोहिदास देवडे, उप अभियंता (मो.क्र. ९६८९९३१३३७) यांचेकडे सोपविणेत येत आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून वरीलप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- **खातेप्रमुख (सर्व)**,
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर . . .